ICE 'n' SPICE
व्हेज रेस्टॉरन्ट
पंजाबी डिशेस् । पावभाजी । चाईनीज । ज्युसेस् । आईस्क्रीम
गोदावरी कॉम्प्लेक्स,व्ही.आय.पी.रोड,नांदेड
मो. 9422172572, 9850430189

सायं दैनिक
नांदेड वार्ता
www.nandedwarta.com
• वर्ष २४ वे • अंक ३०५ • गुरुवार दि.३ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# नांदेडमध्ये ठिकठिकाणी मराठा समाजाचे जोरदार आंदोलन



## हदगाव,हिमायतनगर,कंधार व मुखेडमध्ये कडकडीत बंद

नांदेड/प्रतिनिधी-मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण द्यावे व इतर मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ मराठा आंदोलकांच्यावतीने आज (गुरुवार) नांदेड जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले. कंधार, लोहा, हदगाव, मुखेड, हिमायतनगर या ठिकाणी बंद पाळण्यात आला.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथे गेल्या सहा दिवसांपासून आमरण उपोषण सुरु केले आहे. त्यांच्या मागण्या संदर्भात राज्य शासनाकडून ठोस भूमीका घेतली जात नाही. त्यामुळे मराठा समाजामध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या समर्थनार्थ मराठा समाजाच्यावतीने आज (गुरवार) ठिकठिकाणी आंदोलन करण्यात आले. महादेव पिंपळगाव येथे मराठा आंदोलकांनी रास्तारोको आंदोलन केले. त्यामुळे नांदेड ते नागपूर महामार्गावरील वाहतूक काही तास ठप्प झाली होती. तसेच वाडी रोडवरील जयभवानी चौक, राज कॉर्नर, मुखेड, जांब या ठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. तसेच हदगाव, हिमायतनगर, मुखेड, लोहा, कंधार या ठिकाणी बंद पाळण्यात आला. या बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला आहे. शहरातील बाजारपेठ व दुकाने बंद होती. तसेच नांदेड शहरातील राज कॉर्नर ते जिल्हाधिकारी कार्यालय या मार्गावर मराठा समाज बांधवांनी रॅली काढली. या रॅलीत शेकडो मराठा समाजबांधव सहभागी झाले होते. आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

### ४ सप्टेंबर रोजी नांदेड बंदचे आवाहन

मनोज जरांगे यांच्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्यावतीने शुक्रवार दि.४ सप्टेंबर रोजी नांदेड बंदचे आवाहन करण्यात आले आहे. या बंदमध्ये सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

# डीजेविरोधात आवाज उठवणाऱ्या बापटांना मारहाण

## मानवाधिकार आयोगाचीही दखल

पुणे :गणेशोत्सवातील मिरवणुकांमध्ये डीजे आणि ढोलपथकांच्या माध्यमातून होणाऱ्या कर्णकर्कश ध्वनी प्रदूषणाविरोधात आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांना गुरुवारी मारहाण झाल्याची घटना समोर आली आहे. डीजेच्या मोठ्या आवाजाला विरोध केल्यामुळे बापट गेल्या काही दिवसांपासून चर्चेत होते.

बापट यांनी यापूर्वी पुणे महानगरपालिकेच्या सभेत डीजेच्या आवाजाचा मुद्दा उपस्थित केला होता. त्यावेळी गणेश मंडळांच्या प्रतिनिधींसह काही राजकीय व्यक्तींनी त्यांच्या भूमिकेला विरोध केला होता. आता त्यांच्यावर झालेल्या मारहाणीमुळे ध्वनीप्रदूषणाचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. मारहाणीनंतर बापट यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना, एका व्यक्तीने अचानक आपल्यावर हल्ला केल्याचे सांगितले. या घटनेचे व्हिडीओ फुटेज उपलब्ध असून, पोलिसांनी ते तपासून संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली. हा हल्ला केवळ सवंग प्रसिद्धीसाठी करण्यात आल्याचा पान ४ वर

### मत मांडण्याचा प्रत्येकाला अधिकार:मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई/प्रतिनिधी-पुण्यात डीजे आणि ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर भूमिका मांडणारे सामाजिक कार्यकर्ते विद्यानंद बापट यांच्यावर झालेल्या हल्ल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तीव्र शब्दांत दखल घेतली. कोणत्याही व्यक्तीला आपले मत मांडण्याचा अधिकार असून, त्याला विरोध करण्यासाठी हल्ला करणे योग्य नसल्याचे फडणवीस यांनी स्पष्ट केले. या प्रकरणातील आरोपीला पोलिसांनी अटक केल्याची माहितीही त्यांनी दिली. मुंबईत माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. एखाद्या व्यक्तीच्या भूमिकेशी सहमत नसल्यास त्यावर चर्चा किंवा मतभेद व्यक्त करता येतात; मात्र त्या पद्धतीने हल्ला करणे योग्य नाही. पुण्यासारख्या शहरात अशा प्रकारचे वाद होणे योग्य वाटत नसल्याचेही त्यांनी नमूद केले.

# पावसाने दडी मारल्याने खरीप पिके धोक्यात

## विदर्भातील चार जिल्ह्यांना यलो अलर्ट

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील अनेक भागांत पावसाने दडी मारल्याने खरीप पिके संकटात आली आहेत. पावसाळा सुरू होऊन जवळपास तीन महिने होत आले तरी अनेक भागांत अपेक्षित पाऊस झालेला नाही. त्यामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम झाला असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

मध्य प्रदेशच्या परिसरात तयार झालेला कमी दाबाचा पट्टा उत्तरेकडे सरकल्याने अमरावती आणि गोंदिया जिल्ह्यांसाठी देण्यात आलेला ऑरेंज अलर्ट मागे घेण्यात आला आहे. या दोन्ही जिल्ह्यांसह नागपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी आता यलो अलर्ट देण्यात आला आहे. या भागात हलका पाऊस पडण्याची शक्यता नागपूर वेधशाळेने व्यक्त केली आहे.सध्या विदर्भातील अनेक भागांत ढगाळ वातावरण असून काही ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाच्या सरी पडत आहेत. मात्र, खरीप पिकांना सावरण्यासाठी जोरदार पावसाची आवश्यकता असल्याने शेतकऱ्यांचे लक्ष दमदार पावसाकडे लागले आहे. नागपूर वेधशाळेचे वैज्ञानिक प्रवीण कुमार यांनी विदर्भातील हवामानाबाबत ही माहिती दिली. दरम्यान, जळगाव जिल्ह्यात गेल्या २० ते २५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने शेकडो हेक्टर क्षेत्रातील खरीप पिके धोक्यात आली आहेत. यंदा काही भागांत अतिवृष्टी, तर काही भागांत तुरळक ते मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला. पुढील काळात चांगला पाऊस होईल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी पेरण्या केल्या. मात्र, पिकांची उगवण झाल्यानंतर त्यांच्या वाढीसाठी आवश्यक पाऊस न झाल्याने पिकांवर परिणाम झाला आहे. जळगाव जिल्ह्यातील हलक्या जमिनीतील पिके सुकू लागली असून भारी जमिनीतील पिकांची वाढ खुंटली आहे. उडीद, मूग, सोयाबीन, कापूस आणि मका या पिकांवर पावसाच्या खंडाचा परिणाम झाला आहे. त्यामुळे उत्पादनात घट होण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. पावसाअभावी पिकांसोबतच अनेक भागांत पिण्याच्या पाण्याचा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्नही निर्माण होण्याची शक्यता आहे. मागील वर्षी पान ४ वर

# धनुष्यबाण कुणाचा? शरद पवारांचा संयमाचा इशारा!

## आठ-दहा दिवस थांबा,मग चर्चा करु



मुंबई/प्रतिनिधी-शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण निवडणूक चिन्हाच्या मालकीचा वाद सर्वोच्च न्यायालयात निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. या सुनावणीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मात्र अत्यंत सावध भूमिका घेतली. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी अद्याप पूर्ण झालेली नसताना निकालाबाबत अंदाज व्यक्त करणे योग्य नसल्याचे सांगत पवार यांनी थेट भाष्य टाळले.

शिवसेना चिन्हाच्या वादाचा निकाल नेमका कुणाच्या बाजूने लागेल, असा प्रश्न पवार यांना विचारण्यात आला. त्यावर, मी सांगू शकत नाही, कारण शेवटी कोर्टाचा निकाल आहे. अजून सुनावण्या सुरू आहेत आणि संपलेल्या नाहीत. त्याआधी आपण भाष्य करायचे आणि तुम्ही त्याची नोंद घ्यायची, हे दोघांच्याही हिताचे नाही. त्यामुळे आठ-दहा दिवस वाट पाहू आणि मग चर्चा करू,असे पवार यांनी स्पष्ट केले. पान ४ वर

# गावठी पिस्टल बाळगणाऱ्या तरुणास अटक

नांदेड/प्रतिनिधी-गावठी पिस्टल व जीवंत काडतुस जवळ बाळगून विक्रीचा प्रयत्न करणाऱ्या एका तरुणास स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी बुधवारी वसमत फाटा ब्रिज खाली अटक करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन, स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फौजदार साईनाथ पुयड व पोलीस कर्मचारी अर्धापूर पोलीस स्टेशनच्या हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक तरुण वसमत फाटा ब्रीज परिसरात गावठी पिस्टल विक्री करण्यासाठी फिरत आहे. पोलीसांनी त्वरीत वसमत फाटा ब्रीज खाली सापळा रचून अमोल रमेश गिर्हे (वय २२) रा.सरपंचनगर, मालेगाव रोड,नांदेड यास अटक केली. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता तरुणा जवळ एक गावठी पिस्टल व जीवंत काडतुस आढळून आले. सदरील गावठी पिस्टल हे



नागेश गंगाधर हरबळे रा.धामणगाव ता.वसमत याच्याकडून मिळाले असून विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगल्याचे पोलीसांना सांगितले. याप्रकरणी दोन्ही आरोपी विरुध्द अर्धापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भंडारा,महाप्रसादावर एफडीएची करडी नजर

## दोषींवर थेट न्यायालयात खटले;सर्वधर्मीयांच्या सणांना परिपत्रक लागू



मुंबई/प्रतिनिधी-सण-उत्सवांच्या काळात श्रद्धेच्या नावाखाली नागरिकांच्या ताटात भेसळयुक्त किंवा निकृष्ट अन्नपदार्थ वाढले जात असतील, तर आता त्याची किंमत संबंधितांना मोजावी लागणार आहे. महाप्रसाद, लंगर, भंडारा यांसह सणांच्या काळात मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या अन्नवितरणावर अन्न व औषध प्रशासनाची (एफडीए) थेट नजर राहणार आहे. अन्नभेसळीला आळा घालण्यासाठी एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी स्टँडिंग ऑर्डर्स फॉर ऑल फेस्टिव्हल्स हा वर्षभर लागू राहणारा स्थायी आदेश जारी केला आहे.

सण आला की बाजारात अन्नपदार्थांची मागणी अचानक वाढते. मिठाई, खवा, पनीर, तूप, सुकामेवा, फळे, बेकरी उत्पादने यापासून मांस आणि चिकनपर्यंत अनेक पदार्थांची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. वाढत्या मागणीचा गैरफायदा घेत भेसळ करण्याचे प्रकारही घडतात. नागरिकांच्या आरोग्याशी होणारा हा खेळ रोखण्यासाठी आता सण सुरू होण्यापूर्वीच एफडीएची यंत्रणा कामाला लागणार आहे. यापुढे प्रत्येक सणाच्या वेळी स्वतंत्र तपासणी आदेश काढण्याची गरज राहणार नाही. एफडीएने वर्षभरातील प्रमुख सणांचे कॅलेंडर तयार करून त्यानुसार तपासणी आणि कारवाईचे नियोजन केले आहे. या सणांचे तीन स्तरांत वर्गीकरण पहिला स्तरराज्यव्यापी सण : गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दिवाळी, ईद, नाताळ आणि नववर्षाची पूर्वसंध्या. दुसरा स्तरप्रादेशिक सण : मकरसंक्रांत, महाशिवरात्र, होळी, गुढीपाडवा, आषाढी व कार्तिकी वारी, श्रावण मास, जन्माष्टमी, दहीहंडी, कोजागिरी आणि गुरुनानक जयंती. तिसरा स्तरस्थानिक उत्सव : स्थानिक जत्रा, पालखी सोहळे, उरुस आदींचा समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे हा आदेश कोणत्याही एका धर्मापुरता मर्यादित नसून सर्व धर्मीयांच्या सण-उत्सवांमध्ये अन्नसुरक्षेची समान अंमलबजावणी करण्यावर भर देण्यात आला आहे. एफडीएची मोहीम सणाच्या दिवशी अचानक सुरू होणार नाही. सणाच्या २१ दिवस आधीपासूनच तपासणी मोहीम सुरू होणार असून सण संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत ती सुरू राहणार आहे. या मोहिमेचे चार टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. सणाच्या काळात मोठ्या प्रमाणावर वापरल्या जाणाऱ्या उच्च जोखमीच्या अन्नपदार्थांचे नकाशांकन केले जाईल. कोणत्या भागात कोणत्या पदार्थांची मागणी वाढते, कोणते उत्पादक, विक्रेते आणि पुरवठादार कार्यरत आहेत, याची माहिती संकलित केली जाईल. त्यासाठी विशेष पथके नियुक्त केली जाणार असून प्रयोगशाळांनाही आधीच सतर्क केले जाणार आहे. गिरण्या, घाऊक बाजारपेठा, साठवणूक केंद्रे आणि अन्नपदार्थांची वाहतूक करणाऱ्या वाहनांवर लक्ष ठेवले जाणार आहे. विशेषतः पहाटेच्या वेळी नाका तपासणी करून संशयास्पद वाहतूक आणि अन्नसाठ्यांची तपासणी केली जाणार आहे. सणाच्या दिवशी महाप्रसाद, भंडारा, लंगर तसेच अन्य अन्नवितरणाच्या ठिकाणी भरारी पथके अचानक पोहोचतील. अन्न तयार करण्याची जागा, वापरले जाणारे पाणी, कच्चा माल, स्वच्छता, साठवणूक आणि अन्नवाटपाची प्रक्रिया तपासली जाणार आहे. तपासणीत दोष आढळल्यास संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

# ‘बदलाव जरूरी है’ची सर्वत्र धूम!

**नीट पेपरफुटी प्रकरणानंतर विद्यार्थ्यांच्या मनात खदखदणारा असंतोष फेसबुक, व्हॉट्सप, इन्स्टाग्रामसारख्या समाजमाध्यमांवर व्यक्त होत होता. व्यवस्थेतील विसंगती, परीक्षांमधील गैरप्रकार आणि भवितव्याबाबतची असुरक्षितता यामुळे तरुणाईमध्ये नाराजी होती; मात्र या नाराजीला संघटित रूप देण्याचे काम अभिजीत दिपके या तरुणाने केले. झेन-जीच्या या आंदोलनाने केवळ सरकारचे लक्ष वेधले नाही, तर देशातील राजकीय व्यवस्थेलाही अंतर्मुख होण्यास भाग पाडले. गेल्या काही वर्षांत समाजमाध्यमे ही राजकीय प्रचाराची सर्वांत प्रभावी साधने बनली होती. मोजक्या तरुणांना भावनिक करून, त्यांच्या भावनांना विशिष्ट राजकीय रंग देऊन समाजमाध्यमांवर आपला प्रभाव निर्माण करण्याचे काम काही राजकीय पक्षांनी केले. इतिहासाचे अर्धवट संदर्भ, अपुरी माहिती, अफवा आणि भावनिक आवाहने यांचा सुळसुळाट झाला. त्यातूनच ‘व्हॉट्सप युनिव्हर्सिटी’ हा शब्दप्रयोग रूढ झाला. परंतु दिल्लीतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाने या वातावरणाला वेगळे वळण दिले. प्रश्न विचारणारी, आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणारी आणि व्यवस्थेला जाब विचारणारी तरुणाई समाजमाध्यमांवर दिसू लागली. विशेष म्हणजे दिल्लीतील विद्यार्थ्यांचे आंदोलन उभे राहण्यापूर्वीच भारतीय कम्युनिस्ट पक्षाने ‘बदलाव जरूरी है’ चा नारा देत आंदोलनाची तयारी सुरू केली होती. दिल्लीत झालेली ‘बदलाव जरूरी है’ रॅली मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाली. या घोषणेचा राजकीय अर्थ केवळ सत्ता बदलापुरता मर्यादित नाही. देशाच्या राजकारणाची भाषा, राजकीय पक्षांची कार्यपद्धती आणि जनतेशी संवाद साधण्याची पद्धत बदलण्याची गरज आहे, असा त्यामागचा व्यापक संदेश आहे. दरम्यान, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मुंबईत येऊन देशभरातील सुमारे दोन हजार विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यापूर्वी राहुल गांधी देशातील विविध शहरांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. त्यापाठोपाठ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नागपूरमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राजकीय मतभेद बाजूला ठेवले तरी या घटनांमध्ये एक समान धागा दिसतो.तरुणाईशी संवाद साधण्याची गरज राजकीय व्यवस्थेला प्रकर्षाने जाणवू लागली आहे. हे चित्र काही वर्षांपूर्वीच्या वातावरणापेक्षा निश्चितच वेगळे आहे. समाजमाध्यमांवर हिंदू-मुस्लिम, हिंदू-दलित, ‘बटेंगे तो कटेंगे’ अशा भावनिक आणि ध्रुवीकरण करणाऱ्या मुद्द्यांचा अक्षरशः पूर आला होता. एखाद्या समाजाच्या भावनांना हात घालून राजकीय लाभ मिळविण्याची स्पर्धा सुरू होती. परंतु आता त्या राजकारणाच्या मर्यादा स्पष्ट होऊ लागल्या आहेत. महागाई, बेरोजगारी, शिक्षण, परीक्षा व्यवस्था, रोजगाराच्या संधी, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि सार्वजनिक आरोग्य यांसारखे वास्तव जीवनाशी निगडित प्रश्न तरुणाईला अधिक महत्त्वाचे वाटू लागले आहेत. ही बदलाची चाहूल राजकीय पक्षांनी ओळखली नाही तर त्यांना भविष्यात मोठी किंमत मोजावी लागू शकते. तरुण मतदार केवळ भावनिक भाषणांनी समाधानी राहणारा नाही. त्याला प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. त्याला नोकरी हवी आहे, गुणवत्तापूर्ण शिक्षण हवे आहे, परीक्षांमध्ये पारदर्शकता हवी आहे आणि आपल्या कष्टाला न्याय मिळावा अशी अपेक्षा आहे. त्यामुळे ‘बदलाव जरूरी है’ ही घोषणा केवळ एका राजकीय पक्षाची घोषणा न राहता आजच्या तरुणाईच्या मनातील भावना बनत असेल, तर त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. अर्थात, बदल म्हणजे केवळ चेहरा बदलणे नव्हे. सत्तेवर कोण येते यापेक्षा सत्ता कशी चालवली जाते, प्रशासन किती पारदर्शक आहे, संस्थांवर जनतेचा विश्वास किती आहे आणि तरुणांच्या प्रश्नांना किती गांभीर्याने घेतले जाते, हे अधिक महत्त्वाचे आहे. भावनिक राजकारणाची धार कमी होऊन वास्तवाच्या प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वळत असेल तर ही लोकशाहीसाठी स्वागतार्ह बाब आहे. ‘बदलाव जरूरी है’ ची सर्वत्र सुरू झालेली धूम त्यामुळे केवळ राजकीय घोषणेची धूम मानता येणार नाही. ही बदलत्या मानसिकतेची चाहूल आहे. कालपर्यंत समाजमाध्यमांवर इतरांनी सांगितलेले ऐकणारी तरुणाई आता स्वतः प्रश्न विचारू लागली आहे. हा बदल राजकीय पक्षांसाठी इशारा आहे आणि लोकशाहीसाठी आशेचा किरणही. कारण शेवटी लोकशाहीचा खरा अर्थ सत्तेची पूजा नव्हे, तर सत्तेला प्रश्न विचारण्याची ताकद जिवंत राहण्यात आहे. आणि आजची तरुणाई तेच सांगत आहे. ‘बदलाव जरूरी है!’**

# समयाचे भान ठेवा!

वेळ ही निसर्गाने माणसाला दिलेली सर्वांत मौल्यवान संपत्ती आहे. पैसा हरवला तर पुन्हा कमावता येतो, संपत्ती गेली तर पुन्हा निर्माण करता येते, आरोग्य बिघडले तर प्रयत्नांनी त्यात काही प्रमाणात सुधारणा करता येते; परंतु हातातून निसटलेला एक क्षण पुन्हा कधीही परत येत नाही. म्हणूनच जीवनात मिळालेल्या प्रत्येक क्षणाचे भान ठेवणे आणि त्या प्रत्येक क्षणाकडून विधायक काम करून घेणे, हे प्रत्येक व्यक्तीचे कर्तव्य आहे. व्यक्तीने वेळेचे मूल्य ओळखले तर कुटुंबाची प्रगती होते, कुटुंबे प्रगत झाली तर समाज पुढे जातो आणि समाजाची प्रगती झाली तर राष्ट्राची उन्नती निश्चित होते.

काळ कुणासाठीही थांबत नाही. राजे आले, साम्राज्ये उभी राहिली, सत्तेची शिखरे गाठली गेली आणि त्याच सत्तेचा अस्तही झाला. श्रीमंत आले आणि गेले, उद्योग उभे राहिले आणि काही काळानंतर नाहीसे झाले. अनेकांनी इतिहास घडविला; परंतु काळाची गती मात्र अविरत राहिली. म्हणूनच माणसाच्या हातात असलेली खरी संपत्ती म्हणजे त्याला मिळालेला वर्तमान क्षण. तो कसा वापरायचा, यावर केवळ त्याचे वैयक्तिक आयुष्य नव्हे, तर समाज आणि राष्ट्राचे भवितव्यही अवलंबून असते.आज आपल्या समाजजीवनाकडे पाहिले तर वेळ वाया घालविण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. कोणत्या गोष्टीला किती वेळ द्यायचा, कोणत्या गोष्टीला प्राधान्य द्यायचे आणि जीवनाचा उपयोग नेमका कशासाठी करायचा, याचा विवेक अनेकदा दिसत नाही. क्षुल्लक कारणांवरून वाद, अहंकार, प्रतिष्ठेचे प्रदर्शन, मीपणा, स्वार्थ, राजकीय भांडणे, जातीय संघर्ष आणि एकमेकांवर कुरघोडी करण्यात आपली मोठी ऊर्जा खर्च होत आहे. प्रश्न असा आहे की, या सगळ्यातून आपल्या जीवनाचे आणि राष्ट्राचे नेमके काय साध्य होते? प्रत्येक क्षण आपल्यासमोर काहीतरी करण्याची संधी घेऊन येतो. तो क्षण निघून गेला की त्याच स्वरूपात पुन्हा येत नाही. त्यामुळे वेळ वाया गेला म्हणजे केवळ काही मिनिटे किंवा तास वाया गेले असे नव्हे; तर त्या काळात आपण करू शकलो असतो अशी एखादी निर्मिती, एखादे चांगले काम, एखादा विचार, एखादे ज्ञान किंवा एखादी संधी आपण गमावली, असा त्याचा अर्थ आहे.

आज तंत्रज्ञानाने माणसाच्या हातात अभूतपूर्व साधने दिली आहेत. मोबाईल, इंटरनेट, सामाजिक माध्यमे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारखी साधने ज्ञानाचे प्रचंड भांडार आपल्यासमोर उघडतात. शिक्षण, संशोधन, व्यवसाय आणि संवादाच्या संधी पूर्वीपेक्षा कितीतरी पटीने वाढल्या आहेत. परंतु हीच साधने वेळ खाणारी यंत्रेही ठरू शकतात. एखादा व्हिडिओ पाहता पाहता तास निघून जातो, निरर्थक चर्चेत आपण अडकतो आणि दिवस संपल्यावर हातात काय उरले, याचे समाधानकारक उत्तर मिळत नाही. वेळेचे भान म्हणजे तंत्रज्ञानापासून दूर जाणे नव्हे, तर तंत्रज्ञानाला आपल्या नियंत्रणात ठेवणे होय. मोबाईलने आपले काम सोपे व्हावे; आपण मोबाईलच्या सवयीचे गुलाम होऊ नये. इंटरनेटने ज्ञान वाढावे; निरर्थक माहितीच्या गर्दीत विचार करण्याची क्षमता हरवू नये. कृत्रिम बुद्धिमत्तेने मानवी क्षमता वाढवावी; परंतु माणसाची स्वतःची विचारशक्ती निष्क्रिय होऊ नये. साधने माणसासाठी आहेत, माणूस साधनांसाठी नाही, हे विसरता कामा नये.जगातील अनेक विकसित राष्ट्रांकडे पाहिले तर वेळेला मोठे महत्त्व दिले जाते. शिक्षण, संशोधन, उद्योग, व्यवसाय, तंत्रज्ञान आणि सामाजिक कार्यासाठी वेळेचे नियोजन केले जाते. जर्मनी, फ्रान्स, अमेरिका आणि युरोपातील अनेक देशांनी शिस्त, नियोजन आणि उत्पादनक्षमतेला महत्त्व दिले. चीननेही नियोजन, उत्पादन, पायाभूत सुविधा आणि राष्ट्रीय उद्दिष्टांना महत्त्व देत मोठी झेप घेतली. या समाजांमध्ये समस्या आणि मतभेद आहेत; परंतु उपलब्ध मनुष्यबळ, वेळ आणि संसाधने राष्ट्राच्या प्रगतीसाठी कशी वापरता येतील, याचा विचार केला जातो.

याउलट आपल्याकडे अनेकदा जीवनाचा केंद्रबिंदू व्यक्तिगत स्वार्थाभोवती फिरताना दिसतो. आपले घर, आपली संपत्ती, आपली जात, आपला पक्ष, आपली प्रतिष्ठा आणि आपले राजकारण यापलीकडे विचार करण्याची सवय कमी होत चालली आहे. समाजातील प्रश्नांवर चर्चा करण्यापेक्षा आपापल्या गटाचे समर्थन करण्यात अधिक वेळ जातो. मतभेद असणे चुकीचे नाही; उलट लोकशाहीमध्ये मतभेद आवश्यक आहेत. परंतु मतभेदांचे रूपांतर वैरात झाले की समाजाची ऊर्जा नष्ट होते.भजन-कीर्तन, धार्मिक कार्यक्रम आणि सामाजिक समारंभ हे जीवनाचा भाग असू शकतात. त्यातून मानसिक समाधान मिळते, संस्कार होतात आणि सामाजिक बांधिलकी वाढते. अध्यात्म माणसाला अंतर्मुख करते. परंतु जीवन केवळ भजन आणि भोजनापुरते मर्यादित राहता कामा नये. अध्यात्मासोबत कर्तृत्व, श्रद्धेसोबत परिश्रम आणि भक्तीसोबत जबाबदारीची जाणीव आवश्यक आहे. देवावर विश्वास ठेवणे चांगले; पण देवाने दिलेल्या बुद्धीचा आणि कष्ट करण्याच्या क्षमतेचा उपयोग न करणे योग्य नाही. देव देईल या आशेवर बसून राहिल्याने राष्ट्रे प्रगत होत नाहीत. अन्न मिळविण्यासाठी श्रम करावे लागतात. पैसा कमावण्यासाठी कौशल्य विकसित करावे लागते. समाज बदलण्यासाठी विचार करावा लागतो आणि राष्ट्र घडविण्यासाठी पिढ्यान्पिढ्या प्रयत्न करावे लागतात. प्रार्थना मनाला शक्ती देऊ शकते; परंतु प्रत्यक्ष कृतीची जागा कोणतीही प्रार्थना घेऊ शकत नाही. श्रद्धा माणसाला उभे करण्यासाठी असावी, निष्क्रिय बनविण्यासाठी नव्हे.

आज भारत मोठ्या लोकसंख्येचा देश आहे. ही लोकसंख्या उत्पादक शक्ती बनली तर ती देशाची सर्वांत मोठी ताकद ठरू शकते. पण शिक्षण, रोजगार, कौशल्य, संशोधन आणि उत्पादनापासून ती दूर राहिली तर समस्या निर्माण होऊ शकते. त्यामुळे प्रत्येक तरुणाने स्वतःला प्रश्न विचारला पाहिजेमाझ्या आयुष्यात मला नेमके काय करायचे आहे? केवळ नोकरी, पैसा किंवा पद एवढाच जीवनाचा उद्देश नसावा. आपल्या कर्तृत्वाचा समाजाला आणि राष्ट्राला कसा उपयोग होईल, याचाही विचार झाला पाहिजे. तरुण पिढीला केवळ उपदेश करून घडविता येत नाही. तिच्यासमोर आदर्श निर्माण करावा लागतो. आत्मविश्वास, शिस्त, मेहनत, वैज्ञानिक दृष्टिकोन, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि राष्ट्राविषयीची जबाबदारी तिच्यात निर्माण झाली पाहिजे. आजच्या तरुणाकडे तंत्रज्ञान, माहिती आणि जगाशी जोडले जाण्याची संधी आहे. या सर्वांचा उपयोग स्वतःचे आणि देशाचे भविष्य घडविण्यासाठी झाला पाहिजे. मोबाईलच्या पडद्यावर तासन्तास वेळ घालविण्यापेक्षा एखादे कौशल्य शिकणे, पुस्तक वाचणे, नवीन भाषा आत्मसात करणे, विज्ञान-तंत्रज्ञानाचा अभ्यास करणे, एखादी कला शिकणे किंवा समाजासाठी काहीतरी करणे अधिक महत्त्वाचे नाही का? वेळेचे व्यवस्थापन म्हणजे स्वतःला सतत कामात झोकून देणे नव्हे. काम, विश्रांती, कुटुंब, मनोरंजन आणि सामाजिक जीवन यांचा समतोल राखणे हेदेखील वेळेच्या शहाणपणाचे लक्षण आहे.

आपण भावनिक समाज आहोत. भावना ही माणसाची शक्ती आहे; परंतु विवेकाचा आधार नसलेली भावना अनेकदा



विनाशाचे कारण बनते. जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या, प्रदेशाच्या किंवा राजकीय पक्षांच्या नावावर आपण एकमेकांशी भांडत राहिलो तर राष्ट्राची शक्ती कमी होते. विविधता ही भारताची ताकद आहे; फूट ही कमजोरी आहे. आपली ओळख महत्त्वाची असली तरी ती राष्ट्राच्या एकात्मतेपेक्षा मोठी होता कामा नये.इतिहासाकडून आपण हे शिकले पाहिजे की अंतर्गत फूट समाजाला दुर्बल करते. आजही राजकीय आणि सामाजिक संघर्षात आपण इतकी ऊर्जा खर्च करतो की शिक्षण, रोजगार, आरोग्य, उद्योग, शेती आणि संशोधन यांसारखे मूलभूत प्रश्न मागे पडतात. राजकारण आवश्यक आहे; लोकशाहीसाठी मतभेद आवश्यक आहेत; पण लोकशाहीचा अर्थ सततचा संघर्ष नसून विवेकपूर्ण संवाद आहे. सीमेवर भारतीय सैनिक देशाचे रक्षण करीत उभा असतो. शेतकरी शेतात राबतो. मजूर दिवसभर श्रम करतो. कामगार, डॉक्टर, शिक्षक, अभियंता, वैज्ञानिक आणि उद्योजक आपापल्या क्षेत्रातून राष्ट्रनिर्मितीत योगदान देतात. या प्रत्येकाच्या श्रमात राष्ट्रनिर्मिती दडलेली आहे. म्हणूनच श्रमाचा सन्मान झाला पाहिजे आणि समाजातील प्रत्येक व्यक्तीला सुरक्षित, सन्मानजनक व उत्पादक जीवनाची संधी मिळाली पाहिजे.काम करणाऱ्या माणसाचा वेळ वाचविणे हेही विकासाचे लक्षण आहे. वाहतुकीत तासन्तास वेळ वाया जाणे, सरकारी कार्यालयात कामासाठी वारंवार चकरा माराव्या लागणे, साध्या परवान्यासाठी अनावश्यक विलंब होणे किंवा न्याय मिळण्यासाठी वर्षानुवर्षे प्रतीक्षा करावी लागणे, हे केवळ वैयक्तिक नुकसान नाही; ती राष्ट्रीय उत्पादकतेचीही हानी आहे.



**दत्तोपंत डहाळे**
नांदेड.

न्यायव्यवस्थेपासून प्रशासनापर्यंत प्रत्येक क्षेत्रात वेळेचे महत्त्व ओळखले गेले पाहिजे. एखाद्या नागरिकाचे काम अनावश्यकपणे लांबविणे म्हणजे त्याच्या आयुष्यातील मौल्यवान वेळ हिरावून घेणे होय. आज नाही तर उद्या या मानसिकतेतून राष्ट्र प्रगत होत नाही. वेळेत निर्णय, वेळेत अंमलबजावणी आणि वेळेत परिणाम ही सुशासनाची मूलभूत चिन्हे आहेत.दुसरीकडे शहरी जीवनात उपभोगवाद वाढत चालला आहे. महागडी वाहने, दिखाऊपणा, अनावश्यक खर्च आणि सामाजिक प्रतिष्ठेची स्पर्धा यामध्ये मोठ्या प्रमाणावर पैसा आणि मानसिक ऊर्जा खर्च होत आहे. देशाचा विकास केवळ वस्तू खरेदी केल्याने होत नाही. उत्पादन, संशोधन, कष्ट, प्रामाणिक करभरणा, चांगले शिक्षण आणि जबाबदार नागरिकत्व यांतून विकास घडतो. घराघरांतही वेळेच्या संस्कारांची गरज आहे. मुलांना लाडाने वाढवणे चुकीचे नाही; पण लाडाबरोबर शिस्त आणि जबाबदारीही दिली पाहिजे. संपत्ती देणे सोपे आहे; पण संपत्ती निर्माण करण्याची बुद्धी, कष्ट करण्याची वृत्ती आणि वेळेचे मूल्य समजावून देणे अधिक महत्त्वाचे आहे. वडिलोपार्जित संपत्तीच्या वाटणीवरून अनेक कुटुंबांत संघर्ष निर्माण होतात. भाऊ-बहिणी आणि नातेवाईक एकमेकांविरुद्ध उभे राहतात. संपत्ती मिळविण्यासाठी वर्षानुवर्षे न्यायालयीन लढाया चालतात. किती वेळ, पैसा आणि मानसिक ऊर्जा या संघर्षात खर्च होते! त्या ऊर्जेचा उपयोग शिक्षण, व्यवसाय, उद्योग किंवा समाजकार्यासाठी केला असता तर कदाचित त्यापेक्षा कितीतरी मोठी संपत्ती निर्माण झाली असती. संपत्ती माणसासाठी आहे; माणूस संपत्तीसाठी नाही.

राष्ट्रीय ऊर्जा वाया जाता कामा नये. प्रत्येक नागरिकाची क्षमता ही राष्ट्राची संपत्ती आहे. शिक्षकाचे ज्ञान, शेतकऱ्याचे श्रम, कामगाराचे कौशल्य, डॉक्टरची सेवा, अभियंत्याची बुद्धी, सैनिकाचे शौर्य, वैज्ञानिकाचे संशोधन आणि उद्योजकाची कल्पकता हे सारे राष्ट्रनिर्मितीचे घटक आहेत. या शक्तींचा उपयोग संघर्ष, भ्रष्टाचार, राजकीय स्वार्थ किंवा अनावश्यक वादात झाला तर राष्ट्राच्या प्रगतीचा वेग मंदावतो.विकासाच्या घोषणा मोठ्या प्रमाणावर होतात. उद्घाटने होतात, भूमिपूजने होतात, योजना जाहीर होतात. एवढा निधी आणला, तेवढे काम केले अशा घोषणा ऐकायला मिळतात. पण प्रत्यक्षात त्या पैशातून काय निर्माण झाले? किती काम पूर्ण झाले? कामाचा दर्जा काय आहे? त्याचा जनतेला किती फायदा झाला? याचा पारदर्शक हिशोब समाजासमोर आला पाहिजे.फक्त उद्घाटन करून विकास होत नाही. फलक लावून विकास होत नाही. घोषणा करून विकास होत नाही. विकासासाठी नियोजन, प्रामाणिक अंमलबजावणी, गुणवत्ता, वेळेचे भान आणि उत्तरदायित्व आवश्यक आहे. सार्वजनिक पैसा हा जनतेचा पैसा आहे. त्यामुळे त्याच्या प्रत्येक रुपयाचा हिशोब जनतेला मिळाला पाहिजे. त्याचबरोबर सार्वजनिक कामे वेळेत पूर्ण होणेही तितकेच महत्त्वाचे आहे. वर्षानुवर्षे रखडणारे रस्ते, पूल, इमारती किंवा योजना म्हणजे आर्थिक नुकसानाबरोबरच नागरिकांच्या वेळेचेही नुकसान आहे. राष्ट्र विकासासाठी कर्ज घेते. कर्ज घेणे चुकीचे नाही; परंतु त्याचा उपयोग उत्पादनक्षम क्षेत्रात होतो आहे का, रोजगार निर्माण होतो आहे का, अर्थव्यवस्था मजबूत होते आहे का, याचा विचार झाला पाहिजे. आर्थिक शिस्त ही विकासाला विरोध नसून विकास टिकविण्याची पूर्वअट आहे.

राष्ट्रनिर्मितीमध्ये वेळेबरोबर प्रामाणिकपणालाही महत्त्व आहे. भ्रष्टाचारामुळे केवळ पैसा जात नाही; तर वेळही जातो. अनावश्यक विलंब, दलाली, कागदोपत्री अडथळे आणि निर्णयातील टाळाटाळ यामुळे नागरिकांचा वेळ वाया जातो. भ्रष्टाचाराविरुद्धची लढाई म्हणजे सार्वजनिक पैशाचे संरक्षण करण्याबरोबरच सार्वजनिक वेळेचेही संरक्षण होय.काळ मात्र कुणासाठीही थांबत नाही. आज जन्मलेले मूल उद्या मोठे होईल. आजचा विद्यार्थी उद्याचा अधिकारी, वैज्ञानिक, शेतकरी, कामगार, उद्योजक किंवा लोकप्रतिनिधी होईल. त्याला आपण कोणते संस्कार देतो, यावर देशाचे भविष्य अवलंबून आहे. पुढील पिढीला अहंकार, स्वार्थ, जातीय संघर्ष, भ्रष्टाचार आणि निष्क्रियतेचा वारसा दिला तर उद्याचा भारत अधिक मजबूत कसा होणार?म्हणून आजच विचार करण्याची वेळ आली आहे. जीवन आपल्याला किती वर्षे मिळेल हे कुणालाही माहीत नाही. माणसाने त्याला मिळालेल्या काळाचा सदुपयोग करणे आवश्यक आहे. प्रत्येक दिवसाला अर्थ असावा, प्रत्येक कामाला उद्देश असावा आणि प्रत्येक क्षणातून काहीतरी निर्माण झाले पाहिजे. भजन करा, कीर्तन करा, अध्यात्म जोपासा; पण त्याबरोबर कष्ट करण्याची वृत्तीही जोपासा. देवावर श्रद्धा ठेवा; पण स्वतःच्या कर्तृत्वावरही विश्वास ठेवा. सुख उपभोगा; पण त्या सुखामागे किती जणांचे श्रम आहेत, याची जाणीव ठेवा. स्वतःसाठी जगा; पण समाजासाठी आणि राष्ट्रासाठीही काहीतरी करण्याची इच्छा मनात ठेवा.राष्ट्र म्हणजे केवळ सरकार नाही. राष्ट्र म्हणजे आपण सर्व. सरकारची जबाबदारी आहेच; पण नागरिकांचीही तितकीच जबाबदारी आहे. सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे, कर प्रामाणिकपणे भरणे, नियम पाळणे, दुसऱ्याच्या अधिकाराचा आदर करणे, मुलांना चांगले संस्कार देणे, शिक्षणाला महत्त्व देणे आणि आपल्या व्यवसायात प्रामाणिकपणे काम करणे, हे सारे राष्ट्रसेवेचेच प्रकार आहेत.

वेळेचे भान म्हणजे सतत धावत राहणे नव्हे. विश्रांती आवश्यक आहे, कुटुंबासाठी वेळ देणेही आवश्यक आहे, आनंद घेणेही आवश्यक आहे. परंतु विश्रांती आणि आळस यात फरक आहे. आनंद आणि उधळपट्टी यात फरक आहे. चर्चा आणि निरर्थक वाद यात फरक आहे. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात फरक आहे. विकास आणि केवळ दिखावा यातही फरक आहे. हा विवेक आपण विकसित केला पाहिजे.निसर्गाने आपल्याला दिवसाचे चोवीस तास समान दिले आहेत. कुणाकडे अधिक वेळ नाही आणि कुणाकडे कमी वेळ नाही. मग काही व्यक्ती, संस्था आणि राष्ट्रे पुढे कशी जातात? कारण ते मिळालेल्या वेळेचा उपयोग कसा करायचा हे शिकतात. वेळेचे नियोजन करतात, चुका झाल्या तर त्यातून शिकतात आणि उद्दिष्ट ठरवून सातत्याने काम करतात.आपणही आपल्या जीवनात हा बदल घडवून आणला पाहिजे. उद्या करू हा शब्द शक्य तितका कमी केला पाहिजे. उद्या येईलच याची खात्री नाही; पण आजचा क्षण आपल्या हातात आहे. ज्ञान मिळवायचे असेल तर आजपासून सुरुवात करावी. आरोग्य सुधारायचे असेल तर आजपासून प्रयत्न करावा. मुलांना संस्कार द्यायचे असतील तर आजपासून संवाद साधावा. समाजासाठी काम करायचे असेल तर आजपासून एक पाऊल टाकावे.वेळ निघून गेल्यानंतर पश्चात्ताप करून उपयोग नसतो. गेलेले वर्ष, गेलेला दिवस आणि गेलेला क्षण परत येत नाही. म्हणून प्रत्येक क्षणाकडे संधी म्हणून पाहिले पाहिजे. आपल्या पुढच्या पिढीला केवळ संपत्तीचा वारसा नको; विचारांचा वारसा हवा. केवळ घराचा वारसा नको; कर्तृत्वाचा वारसा हवा. केवळ अधिकार नको; जबाबदारीची जाणीव हवी. केवळ स्वार्थ नको; राष्ट्रहिताचा विचार हवा.

इतिहासाकडे केवळ गौरवाने पाहू नका; त्यातून धडा घ्या. सत्ता कायमची नसते, संपत्ती कायमची नसते, प्रसिद्धी कायमची नसते. पण आपण केलेले चांगले काम, निर्माण केलेले ज्ञान, समाजाला दिलेली दिशा आणि राष्ट्रासाठी केलेले योगदान पुढे राहते. म्हणूनच जीवनाचा प्रत्येक क्षण फुलवा. आनंद घ्या; पण त्या आनंदाला अर्थ द्या. कुटुंबावर प्रेम करा; पण समाजाचीही काळजी घ्या. स्वतःची प्रगती करा; पण आपल्या प्रगतीतून इतरांनाही उभे करण्याचा प्रयत्न करा. आपल्या मुलांना मोठे करा; पण त्यांना चांगले नागरिक बनविण्याची जबाबदारी विसरू नका.आज वेळ आपल्या हातात आहे. उद्या ती असेलच असे नाही. म्हणून आजचा दिवस उद्यावर ढकलू नका. एखादे चांगले काम करण्यासाठी योग्य वेळ शोधत बसू नका. योग्य वेळ अनेकदा आजच असतो.प्रत्येक क्षणाकडून काम घ्या. प्रत्येक दिवसाला अर्थ द्या. प्रत्येक कर्तृत्वातून राष्ट्राची उन्नती घडवा. कारण वेळ वाया जाणे म्हणजे केवळ घड्याळातील काटा पुढे जाणे नव्हे; तर आपल्या जीवनातील ऊर्जा, क्षमता आणि संधी निसटून जाणे होय.गेलेला क्षण परत येत नाही. म्हणून निसर्गाने दिलेल्या या अमूल्य वेळेचा सदुपयोग करणे हेच मानवाचे खरे कर्तव्य आहे. आज आपण जागे झालो, तर उद्याचा भारत अधिक सक्षम, अधिक विवेकी आणि अधिक समृद्ध होईल. पण आजचा वेळही आपण मीपणा, स्वार्थ, अहंकार आणि निरर्थक संघर्षात घालवला, तर उद्या पश्चात्ताप करण्याची वेळ येईल.

वेळ कुणासाठीही थांबत नाही. तो पुढे जातच राहतो. म्हणून समयाचे भान ठेवा. प्रत्येक क्षण जपा. प्रत्येक क्षणातून काम घ्या आणि आपल्या जीवनाला, समाजाला व राष्ट्राला प्रगतीची नवी दिशा द्या.कारण शेवटी माणसाच्या आयुष्याची खरी ओळख त्याने किती काळ जगले याने होत नाही; तर मिळालेल्या काळाचा त्याने किती अर्थपूर्ण उपयोग केला याने होते. काळाच्या प्रवाहात आपले अस्तित्व क्षणभंगुर आहे; पण त्या क्षणांना दिलेला अर्थ चिरंतन ठरू शकतो.म्हणून आजचा क्षण वाया जाऊ देऊ नका. समयाचे भान ठेवा, कारण वेळ निघून गेल्यावर संधी उरते ती केवळ पश्चात्तापाची.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# हदगावातील दारु दुकानामुळे विद्यार्थी, महिला त्रस्त ; पोलिसांकडे कारवाईची मागणी

हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरातील बसस्थानक परिसरातील मुख्य मार्गावर असलेल्या देशी दारू दुकानामुळे परिसरातील नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. या दुकानासमोर मद्यपींकडून सार्वजनिक ठिकाणी मद्यपान, आरडाओरड, लघुशंका तसेच रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे प्रकार घडत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

या प्रकरणी भाजपचे सक्रिय कार्यकर्ते तथा माजी नगरसेवक प्रा. संदीप भुरे यांनी हदगाव पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांकडे निवेदन देऊन संबंधित दुकानासंदर्भात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.शाळकरी विद्यार्थी, विद्यार्थीनी तसेच महिला, नागरिकांची मोठ्या प्रमाणावर या मार्गावरून ये-जा असते. मात्र, मुख्य रस्त्यालगत असलेल्या दारू दुकानासमोर मद्यपींचा वावर वाढल्याने या मार्गावरून जाताना महिला व विद्यार्थिनींना असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. दुकानासमोर वाहनांची गर्दी होणे आणि रस्त्यावरच मद्यपान करण्याचे प्रकार घडत असल्याने वाहतुकीलाही अडथळा निर्माण होत असल्याची तक्रार आहे. सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करू नये, याबाबत मद्यपींना समज देण्यात आली असतानाही रस्त्यावर मद्यपान व गैरवर्तनाचे प्रकार सुरूच असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. या प्रकारांकडे वेळीच लक्ष न दिल्यास भविष्यात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे पोलिसांनी संबंधित परिसरात नियमित गस्त वाढवावी, सार्वजनिक ठिकाणी मद्यपान करणाऱ्यांवर कारवाई करावी तसेच दारू दुकानासमोरील अनधिकृत वाहनतळ, लघुशंका आणि इतर गैरप्रकारांना आळा घालावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. दारू दुकानांच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांवर विविध प्रकारे दबाव आणला जात असल्याची चर्चाही शहरात सुरू असल्याचा दावा नागरिकांकडून करण्यात येत आहे. मात्र, या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही. निवेदनावर ललिताई फाळके, जाकीर शेख, दिलीप राव, सुमित चिंचोलकर, निलेश गोरेडे, रामभाऊ गोरेडे, दिलीप मोकाटे यांच्यासह परिसरातील



अनेक नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत. दरम्यान, हदगाव शहरातील मुख्य चौकात व शाळांच्या परिसरात देशी-विदेशी मद्यविक्रीची दुकाने सुरू असल्याबाबतही नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ज्या ठिकाणी बालवाडी किँवा शैक्षणिक उपक्रमांना प्राधान्य मिळायला हवे, त्या परिसरात मद्यविक्रीची दुकाने सुरू असल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

## दोघांना काठी, कत्तीने मारहाण

नांदेड/प्रतिनिधी-लोहा तालुक्यातील सांगुचीवाडी येथे ३० ऑगस्ट रोजी शेतातून बैल घेवून जाण्याच्या क्षुल्लक कारणावरुन श्रीनिवास शेवाळे व संजय शेवाळे यांनी उत्तम निवृत्ती भिसे (वय ४८) आणि साक्षीदारास शिवीगाळ करत काठी व कत्तीने मारहाण करुन गंभीर दुखापत केली.

भांडण सोडवण्यासाठी आलेल्या मुलीलाही मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी लोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# डीजेमुक्त पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करु या-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-गणेशोत्सव व दहीहंडी उत्सव एकत्रित येत असून जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी परस्पर सौहार्द, शांतता व सर्वधर्मसमभाव राखून सण साजरे करावेत. नांदेड जिल्ह्यात डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करून पर्यावरण संरक्षणाचा वेगळा संदेश द्यावा, तसेच गणेश मंडळांनी विविध सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे गणेशोत्सव, दहीहंडी, पोळा व इतर सण उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली आज संपन्न झाली. या बैठकीस आ.अमर राजूरकर, महापौर कविता मुळे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक अर्चना पाटील, मनपा अपर आयुक्त गिरीश कदम, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह शांतता समितीचे सदस्य, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी आदी उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी श्री. कर्डिले यांनी गणेशोत्सव काळात कोणालाही त्रास होणार नाही याची मंडळांनी दक्षता घ्यावी. ध्वनी प्रदूषण टाळण्यासाठी डीजेचा वापर न करता डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करावा. नदीच्या वाहत्या प्रवाहात गणेशमूर्तींचे विसर्जन न करता कृत्रिम तलावांचा वापर करावा. घरगुती गणेशमूर्तींचे घरोघरी संकलन करण्याबाबतही प्रशासनाने नियोजन करावे, अशा सूचना दिल्या. उत्सव काळातील नागरिक व गणेश मंडळांच्या अडचणी तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनाच्यावतीने व्हॉट्सपग्रुप तयार करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# नांदेड शहरातील ५४ वीज चोरांविरुध्द कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरात वाढत जाणारी विजेची वितरण व वाणिज्यक हाणी कमी करून ग्राहकांना अधिक सुरळित व अखंडित वीज पुरवठ्यासाठी महावितरणने वीज चोरांविरूध्द मोहिम हाती घेतली आहे. ऑगस्ट २०२६ मध्ये महावितरणच्या कारवाईत नांदेड शहरात ५४ वीज चोरांविरूध्द कारवाई केली असून १२ जणांविरूध्द पोलिसात गुन्हेही दाखल करण्यात आले आहेत.

मुख्य अभियंता राजाराम माने आणि अधिक्षक अभियंता संजय खंदारे यांच्या निर्देशानुसार नांदेड शहरातील शहर उपविभाग १, शहर उपविभाग २, व एमआयडीसी उपविभागात वीज चोरांची शोध मोहिम राबविण्यात आली. त्यात ५४ जणांनी वीज मिटरमध्ये फेरफार करून चोरी केल्याचे आढळून आले. या चोरांनी ३२ हजार ४०२ यूनिट विजेची चोरी केली व असून त्याचे ६ लाख ९४ हजार ९७० रूपये इतके मूल्य आहे. त्यांच्या विरूध्द भारतीय विद्युत कायदा कलम १३५ नुसार कारवाई करण्यात आली आहे, चोरीत वापरलेल्या ३२,४०२ युनिटच्या बिलाची वसुली प्रक्रियाही सुरू आहे. तर त्याच कायद्यानुसार मोह्मद सरवार रा. गोपाळ चावडी, मोह्मद हाजीक मोह्मद फारूक रा. मुजमपेठ, सुमन शिंदे रा. शिंदे गल्ली, सुनिल जाधव रा. धनेगाव, व्यंकट तोकलवाड रा. शंकर नगर, मोह्मद बाबू अहेमद रहेमान कुरेशी रा. महेबूब नगर, नदाफ नजूकमियाँ छोटेमियाँ रा. महेबूब नगर, रामकौर बाबुराव कांबळे दोन वीज जोडण्या रा. गोविंद नगर, हुलाजी अबाजी बोयेवार रा. गांधी नगर, दयानंद बुध्दाजी भालेराव रा. बेला नगर यांनीही मीटरमध्ये मोडमोड करून वीज चोरी केल्या प्रकरणी शहरातील पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आल्याची माहिती नांदेड शहर विभागाचे कार्यकारी अभियंता शैलेश कलंत्री यांनी दिली.

# दोन आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना १ लाखाची शासकीय मदत



किनवट/प्रतिनिधी-किनवट तहसील कार्यालयाच्या कार्य कक्षेतील बेल्लोरी (धा) येथील शेतकरी स्व.अर्जुन लक्ष्मण फड आणि शनिवारपेठ येथील शेतकरी स्व. ज्ञानेश्वर प्रेमसिंग राठोड यांनी शेतीतील सततचे नुकसान, नापिकी तसेच झालेल्या कर्जाच्या ओझ्यामुळे उद्भवलेल्या आर्थिक विवंचनेतून आत्महत्या केली. त्यांच्या पश्चात त्याच्या वारसांना मदतीचे धनादेश देण्यात आले. जिल्हाधिकारी नांदेड यांच्या आदेशावरून तहसीलदार डॉ.शारदा चौंडेकरांनी धनादेश वितरित केले.

या दुर्दैवी घटनांनंतर सहाय्यक जिल्हाधिकारी डॉ. बी. सरवनन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक महसूल, कृषी व पोलीस प्रशासनामार्फत संयुक्त पंचनामा करून वस्तुनिष्ठ अहवाल जिल्हास्तरीय शेतकरी आत्महत्या तपासणी व मदत समितीकडे सादर करण्यात आला होता. समितीच्या निकषांनुसार आणि छाननीनंतर ही दोन्ही प्रकरणे शासकीय मदतीसाठी पात्र ठरविण्यात आली. त्यानुसार जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी १४ ऑगस्ट रोजीच्या अधिकृत आदेशानुसार दोन्ही मृत शेतकऱ्यांच्या कायदेशीर वारसांना प्रत्येकी रु. १,००,०००/- (अक्षरी रुपये एक लाख फक्त) आर्थिक सहाय्य मंजूर केले आहे. सदर मदतीचे धनादेश मयताचे वारस श्रीमती मनिषा ज्ञानेश्वर राठोड आणि लक्ष्मण देविदास फड यांना रोख ३००००/- व मासिक प्राप्ती योजनेत ७००००/- या प्रमाणे प्रत्येकी धनादेश तहसिलदार डॉ.शारदा चोंडेकर यांचे हस्ते अदा करण्यात आले. यावेळी मंडळ अधिकारी जयराम गाडे, ग्राम महसुल अधिकारी विश्वास फड व आपत्ती व्यवस्थापन शाखेचे एफ.जी.खान हे उपस्थीथी होते. सदर मदतीमुळे संकटात सापडलेल्या पीडित शेतकरी कुटुंबांना तात्पुरता का होईना एक मोठा आधार मिळाला आहे. ही मदत रक्कम थेट वारसांच्या बँक खात्यात वर्ग करण्याची कार्यवाही तालुका प्रशासनामार्फत तातडीने पूर्ण करण्यात आली आहे.

## मोघाळी येथील जुगार अड्ड्यावर पोलीसांची धाड

नांदेड/प्रतिनिधी-मौ.मोघाळी ता.भोकर येथे सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलीसांनी धाड टाकुन ११ जणांना अटक केली आहे.

मौ.मोघाळी येथील एका पत्राच्या टिनशेडमध्ये जुगाराचा अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीसांना मिळाली. पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड, फौजदार सागर झाडे व पोलीस कर्मचाऱ्यांनी बुधवारी सायंकाळी जुगार अड्ड्यावर धाड टाकली. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना नरसिंग आनंदा राचेवाड (वय ४०), दत्ताहरी संभाजी शिंदे (वय ३७), साहेबराव किशन पंतुलवार (वय २७), भास्कर ब्रह्मदेव उपरवट (वय ४०) रा.देऊळगाव ता.पातुर, पिराजी लक्ष्मण धोतरे (वय ४२) रा.चिंचाळा, हर्षवर्धन उत्तम देवके, मोहन गंगाधर वाघमारे (वय ५०), आनंदा हणमंतराव सोळंके (वय ४६), पांडूरंग दिगांबर कदम (वय ४१), चांदु नागोराव शिंदे (वय ६५), बालाजी उत्तमराव पवार (वय ४६) सर्व रा.मोघाळी यांना रंगेहाथ पकडले. पोलीसांनी घटनास्थळावरुन सहा मोबाईल, एक दुचाकी असा २ लाख १५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला.

# उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी उमरखेडमध्ये मातंग समाजाचा महामोर्चा



उमरखेड/प्रतिनिधी-मोठ्या भावाने आजवर समता, न्याय, बंधुता या तत्त्वाप्रमाणे काम केले असते तर आज आम्हाला आमच्या लेकरा-बाळांसाठी मोर्चा काढण्याची वेळ आली नसती. आम्ही आमचा हक्क मागत आहोत, त्यामुळे मोठ्या भावाने आमच्या वाटेला येऊ नये, असे आवाहन माजी आ.नामदेव ससाने यांनी केले.

अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ सकल मातंग समाजाच्या वतीने बुधवार दि.२ सप्टेंबर रोजी उमरखेड येथे जनआक्रोश महामोर्चाचे आयोजन करण्यात आले होते. आबालवृद्धांसह हजारो समाज बांधव या मोर्चात सहभागी झाले होते. हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला. तेथे मोर्चाचे रूपांतर जाहीर सभेत झाले. या सभेत गणपतराव भिसे, डॉ. अंकुश दोतावळे, कैलास खंदारे, के.डी. पवार, मारोतराव वाडेकर, धुरपता कांबळे, संजय कंठाळे, माजी नगराध्यक्ष के. मूर्ती (किनवट), गुणवंत काळे, डॉ. अंकुश गोतावळे, विजय रणखांब आदी मान्यवरांनी उपवर्गीकरणाच्या समर्थनार्थ आपले विचार मांडले. यावेळी बोलताना माजी आ.ससाने म्हणाले, मोठ्या भावाने १९८७ पासून २०२३ पर्यंत आरक्षणावरच ताव मारला आहे. आता आमची मुले सुशिक्षित झाली आहेत. त्यांना संधी मिळावी यासाठी सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाचे निर्देश दिले असून त्याची अंमलबजावणी करण्याचे अधिकार राज्य सरकारला दिले आहेत. शासनाने याची तात्काळ अंमलबजावणी करावी, अन्यथा आंदोलनाचा रेटा कायम ठेवावा लागेल, असा इशारा त्यांनी दिला. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दत्तात्रय काळे यांनी केले, तर संचालन राजू गायकवाड यांनी केले. हा महामोर्चा यशस्वी करण्यासाठी समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.

# उद्या नांदेड बंदची हाक

## सकल मराठा समाजाची घोषणा

नांदेड/प्रतिनिधी-मराठा आरक्षणाच्या ५८ लाख कुणबी नोंदीच्या अंमलबजावणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील यांनी सुरु केलेल्या आमरण उपोषणाच्या समर्थनार्थ ४ सप्टेंबर रोजी नांदेड बंदची घोषणा सकल मराठा समाज नांदेडच्या वतीने शासकीय विश्रामगृह नांदेड येथे आयोजित पत्रकार परिषदेत करण्यात आली. मराठा समाजाला कुणबी संबोधुन ओबीसीचे दाखल द्यावेत, या मागणीसाठी संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील हे गत तीन वर्षांपासून अंतरवाली सराटी तसेच मुंबई येथे आमरण उपोषण करत आहेत. ज्या समाज बांधवांना कुणबीचे पुरावे मिळाले, त्यांना प्रमाणपत्र दिले परंतु त्याची व्हॅलिडीटी होत नाही, हे निदर्शनास आल्यावर जरांगे पाटील यांनी पुन्हा अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण चालू केले आहे. त्या आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे.त्यांची प्रकृती दिवसेंदिवस खालावत आहे.

# जन्म दाखल्याच्या नवीन अटीमुळे निराधारांची फरपट

देगलूर/प्रतिनिधी-गरीब, निराधार आणि वयोवृद्ध नागरिकांना आधार देण्यासाठी शासनाच्या विविध सामाजिक सुरक्षा योजना राबविल्या जातात. मात्र, आता याच योजनांचा लाभ घेण्यासाठी जन्मतारखेच्या पुराव्याच्या नावाखाली जास्त अटी लादल्या जात असल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे.

श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेसह विविध योजनांच्या लाभासाठी जन्मतारखेचा पुरावा सादर करण्याची अट लागू करण्यात आली आहे. संबंधित कार्यपद्धतीनुसार आवश्यक ती कागदपत्राची पूर्तता करणे लाभार्थ्यांसाठी बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र ज्या ज्येष्ठ नागरिकांनी आयुष्याची ६०-७० वर्षे पूर्ण केली आहेत. त्यांच्याकडे जन्मतारखेचा दाखला कुठून येणार? ग्रामीण भागातील अनेक वृद्ध नागरिकांच्या जन्माची नोंदच झालेली नसताना त्यांच्याकडून जन्म प्रमाणपत्र अथवा जुने शैक्षणिक कागदपत्रे मागणे म्हणजे त्यांच्या अडचणीमध्ये भर घालण्याचा प्रकार असल्याची संतप्त भावना व्यक्त होत आहे.योजना कागदपत्रांसाठी नसतात त्या गरजू माणसासाठी असतात, त्यामुळे नियमाच्या नावाखाली गरिबांच्या हक्काच्या निवृत्ती वेतनावर गदा आणू नये अशी मागणी देगलूर शहर तालुक्यातील ग्रामस्थ करीत आहेत. शासनाने या निर्णयाचा तातडीने पुनर्विचार करून जन्म तारखेच्या पुराव्या बाबत पर्यायी आणि सुलभ व्यवस्था करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

# पोर्टलद्वारे शिक्षक पदी निवड झाल्याबद्दल आदिवासी शिक्षकांचा सत्कार

मांडवी/प्रतिनिधी-क्रांतीसूर्य बिरसा मुंडा सेवाभावी संस्था, पिपंळगांव (सि.) यांच्या वतीने पवित्र पोर्टल अंतर्गत शिक्षण क्षेत्रात नव्याने रुजू झालेल्या आदिवासी समाजाच्या नवनियुक्त शिक्षकांचा विशेष सत्कार सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आदिवासी समाजाचे ज्येष्ठ नेते नारायणराव सिडाम होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रप्रमुख विजय मडावी, रामदास मेश्राम, गोवर्धन मेश्राम व बाबुलाल चौधरी उपस्थित होते. प्रारंभी आदिवासी समाजाचे आराध्य दैवत 'हिरासुका लिंगो' यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. प्रास्ताविकातून गोपाल देवकामाई रामदास कनाके यांनी संस्थेच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या सामाजिक, शैक्षणिक, अध्यात्मिक व मानवतावादी उपक्रमांची माहिती दिली. पवित्र पोर्टल प्रक्रियेतून गुणवत्तेच्या आधारावर निवड झालेल्या गंगाधर उईके, शुभांगी कनाके, किरण डोंगरे, कल्पना सिडाम, बालाजी गेडाम या गुणवंत शिक्षकांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सर्व सत्कारमूर्तींचा पारंपरिक



आदिवासी गमछा, पुष्पहार आणि दैवत हिरासुका लिंगो यांची प्रतिमा भेट देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना नारायणराव सिडाम, रामदास मेश्राम, विजय मडावी आणि शिक्षक दौडीवार यांनी नवनियुक्त शिक्षकांनी ज्ञानदानाच्या कार्यातून समाजाचे नाव उज्वल करावे, असे मत मांडले. या सोहळ्यास ज्ञानेश्वर सिडाम, नितीन कनाके, रामेश्वर चांदेकर, हर्षद कनाके, संतोष कनाके, संदीप कनाके, तलाठी विक्रम चौधरी, विवेक सलाम यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवीराज कोवे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार बालाजी कनाके यांनी मानले.

# सरकारच्या घरकुल योजनेत मागासवर्गीयांना मागासलेलं ठेवण्याचा डाव

मुदखेड/प्रतिनिधी- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सर्वांना घर देण्याची संकल्पना मनात धरून ही योजना प्रभावीपणे राबविण्याचे ठरवले आहे, परंतु शहरी भागासाठी घरकुलांना जास्त बजेट तर ग्रामीण भागासाठी घरकुलांना कमी बजेट असा दुजाभाव करून रमाई आवास योजनेत मागासवर्गीयांना मागासलेलेच ठेवण्याचा डाव सरकारकडून होत असल्याचा आरोप जनतेतून केला जात आहे.

सरकारकडून पंतप्रधान आवास योजना व रमाई आवास योजना राबवली जाते. या योजनेत शासनाकडून शहरी भागासाठी २ लाख ८० हजार रुपये एवढा निधी मिळत असल्याचे समजते तसेच ग्रामीण भागात मात्र पंतप्रधान आवास योजनेसाठी १ लाख ९० हजाराच्या जवळपास निधी मिळतो व रमाई योजनेसाठी मात्र १ लाख ४५ हजार रुपये निधी मिळतो, अशा तक्रारी घरकुलधारकांकडून करण्यात आल्या आहेत. पंतप्रधान आवास योजनेत सर्वसाधारण तसेच इतर मागासवर्गीय यांना घरकुले मिळतात. रमाई आवास योजनेत अनुसूचित जातीच्या नागरिकांना घरकुल मंजूर केले जातात. शासनाकडून मागसवर्गीयाना कमी बजेट देवून मागासलेलेच ठेवण्याचा डाव आखल्या जात असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. १ लाख ४५ हजार रुपये निधी मिळतो यात घरकुल सुद्धा होत नाही. सिमेंटचे दर, रेतीचे दर आणि स्टीलचे दर पाहता घरकुलांना मिळतात त्यापेक्षा अधिक पैसे टाकून गरिबांना घर बांधावे लागत आहे. शासनाच्या रमाई आवास योजनेचे घरकुल १ लाख ४५ हजार एवढ्या कमी बजेटमध्ये घरकुलाचे बांधकाम होत नसल्याने गरीबाची कुचंबना होत आहे. या गंभीर बाबीकडे लोकप्रतिनिधी जानीव पुर्वक दुर्लक्ष करित असल्याचा अरोप होत आहे.याकडे सत्तेत असलेले



लोकप्रतिनिधी व विरोधी पक्षाच्या लोकप्रतिनिधीं या गंभीर बाबीकडे लक्ष देण्यास तयार नसल्याचे दिसून येते. सरकारकडून शहरी भागासाठी जास्त बजेट ग्रामीण भागासाठी कमी बजेट देऊन दुजाभाव निर्माण केल्याने अनेक जण सरकारच्या विरोधात बोलताना दिसतात. या गंभीर प्रश्नाकडे लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन समान निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी ग्रामीण भागातील घरकुलधारकांकडून केली जात आहे.

# बीएसएफ सोडून पोलीस भरतीची तयारी; २३ वर्षीय होमगार्डचा दुर्दैवी मृत्यू

किनवट/प्रतिनिधी-मांडवी पोलीस ठाण्यात ड्युटीवर असलेल्या गणेश मदन चौफाडे या २३ वर्षीय होमगार्ड तरुणाने गोकुंद्या येथील राहत्या रुममध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवार दि.२ सप्टेंबर रोजी रात्री घडली आहे.



पोलीस प्रशासनाच्या सोपस्कार पार पडले. मयत गणेश हा मुळचा सावरगाव तांडा येथील रहिवासी आहे. आज ३ रोजी सायंकाळी त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. गणेशच्या लहाणपणीच वडिलांचे छत्र हरपले. वडिलांच्या पश्चात आईने अत्यंत हालअपेष्टा सहन करत लहानाचा मोठा केले. गणेशची यापूर्वी 'बीएसएफ' मध्ये निवड झाली असताना सुद्धा राजीनामा देऊन तो परत आला आणि होमगार्ड प्रवेशानंतर मांडवी पोलीसात ड्युटीवर होता. पोलीस भरतीच्या तयारीसाठी तो गोकुंद्या येथे भाड्याने राहत होता.२ सप्टेंबर रोजी रात्री त्याने राहत्या खोलीत गळफास लावून आपली जीवनयात्रा संपवली. त्याच्या या टोकाच्या निर्णयामुळे परिसरात मोठी हळहळ व्यक्त केलीय. आत्महत्या करण्याचे मूळ कारण अद्याप समोर आले नसून कदाचित पोलीसांच्या पुढील तपासातून सर्व काही स्पष्ट होऊ शकेल. २३ ऑगस्ट रोजी सुद्धा कोठारी (मांडवी) येथील २२ वर्षीय तरुणाचा कोठारी नाल्यात बुडून आकस्मिक मृत्यू झाला. पोलीस भरतीपूर्व तो गोकुंद्या येथे प्रशिक्षण घेत असताना ही दुर्दैवी घटना घडल्याचे वृत्त आहे.




मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या सहा दिवसांपासून अंतरवाली सराटी येथे आमरण उपोषण सुरु केले आहे. या उपोषणाच्या समर्थनार्थ सकल मराठा समाजाच्यावतीने वाडी रोडवरील जय भवानी चौकात रास्तारोको आंदोलन आज (गुरुवार) करण्यात आले. या आंदोलनात असंख्य मराठा बांधव सहभागी झाले होते.

# ऐन फलधारणेत खरिपाची पिके धोक्यात;बळीराजा संकटात

## धर्माबाद परिसरात पावसाचा खंड

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद तालुका आणि परिसरात गेल्या दोन आठवड्यांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्यामुळे खरीप पिकांची स्थिती अत्यंत नाजूक झाली आहे. सततच्या खंडामुळे कापूस, सोयाबीन, तुर, मुग आणि उडीद या प्रमुख पिकांची वाढ खुंटली असून, तीव्र उन्हामुळे ही पिके आता करपू लागली आहेत. येत्या काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास उत्पादनात प्रचंड घट होण्याची भीती शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

उशिरा पेरण्या अन् अवाढव्य खर्च झाला आहे. यावर्षी मान्सूनचे आगमन लांबल्याने जून महिना पूर्णपणे कोरडा गेला होता. जुलैच्या पहिल्या आठवड्यात पाऊस आल्याने शेतकऱ्यांनी उशिराने पेरण्या उरकल्या. त्यानंतर पिके जोमात आणण्यासाठी शेतकऱ्यांनी महागडी खते, कोळपणी आणि कीटकनाशकांच्या फवारणीवर मोठा खर्च केला. मात्र, आता पिके ऐन फुलोऱ्यात आणि फलधारणेच्या संवेदनशील टप्प्यात असतानाच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. कोरडवाहू क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहीर किंवा कूपनलिकेची सोय आहे, ते शेतकरी ठिबक अथवा तुषार सिंचनाद्वारे पिके वाचवण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहेत. मात्र, तालुक्यातील बहुतांश कोरडवाहू क्षेत्रातील जमिनीला भेगा पडू लागल्या आहेत. पाण्याअभावी पिके माना टाकत असून कपाशी आणि सोयाबीनचे उभे पीक जळून जाण्याच्या मार्गावर आहे. संपूर्ण मराठवाड्यातच ऑगस्ट महिना कोरडा गेल्याने व नांदेड जिल्ह्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाल्याने दुष्काळाचे सावट गडद झाले आहे. उत्पादन खर्च निघणेही आता कठीण झाले असून, महसूल व कृषी विभागाने तात्काळ परिस्थितीची पाहणी करून पंचनामे करावेत आणि धर्माबाद तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत व पीक विमा मंजूर करावा, अशी आर्त हाक धर्माबाद तालुक्यातील संतप्त व हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी दिली आहे.

# जांब बु.येथे रास्ता रोको, दोन तास वाहतूक खोळंबली

मुखेड/प्रतिनिधी-मराठा संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या अमरण उपोषणच्या समर्थनार्थ आज ३ सप्टेंबर रोजी सकल मराठा समाज मुखेड तालुक्याच्या वतीने पूर्ण शहर अतिशय शांततेच्या मार्गाने बंद करून मनोज जरांगे पाटील यांना उपोषणास पांठींबा दिला.

सकाळी सर्व कार्यकर्त्यांनी बाजारपेठ बंद करण्याचे आवाहन केल्यामळे सर्व व्यापाऱ्यांनी प्रतिसाद दिला. आजच्या बंदमध्ये एस. टी. वगळता सर्व कार्यालय सुरळीतपणे चालू होते. दरम्यान जा जांब बु. येथे दिवसभर कडकडीत बंद पाळण्यात आला. तसेच रास्ता रोको करण्यात आल्याने सामान्य जनजीवन विस्कळीत झाले होते. बाराहाळी, मुक्रमाबाद, बेटमोगरा, येवती आदी भागातील सर्व व्यवहार सुरळीतपणे चालू होते. एस. टी. बसेस बंद असल्यामुळे शाळकरी विद्यार्थी, प्रवासी वर्गाची हेळसाड झाली. आटोवाल्यानी मात्र हात धुवून घेत जादा दराने आपली वाहतूक चालू ठेवल्याचे समजते.

# बांधकाम कामगार पाल्यांच्या शिष्यवृत्तीला 'ब्रेक';मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न ऐरणीवर

देगलूर/प्रतिनिधी-महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी महामंडळाच्या माध्यमातून बांधकाम कामगाराच्या पाल्यांना शिक्षणासाठी विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. मात्र, मागील एक वर्षापासून अनेक पात्र लाभार्थ्यांना शिष्यवृत्तीचे रक्कम मिळालेली नसल्याने बांधकाम कामगार समोर आपल्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च भागविण्याचे मोठे आव्हान उभे राहिले आहे.

बांधकाम कामगाराच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करून त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी महामंडळाकडून विविध शैक्षणिक योजनांचा लाभ दिला जातो. त्यामुळे अनेक गरीब व गरजू कामगारांच्या पाल्यांना उच्च शिक्षण घेण्यास मदत होते. परंतु मागील वर्षभरापासून शिष्यवृत्तीची प्रकरणे प्रलंबित असल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्याचबरोबर बांधकाम कामगाराच्या नूतनीकरणाची अनेक प्रकरणी ही अद्याप प्रलंबित आहेत. नूचनीकरण पूर्ण न झाल्यामुळे संबंधित कामगारांना महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेता येत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे पात्र असूनही अनेक कामगार व त्यांचे पाल्य शासकीय योजना पासून वंचित राहत आहेत.संबंधित विभागाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन कामगारांच्या पाल्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शैक्षणिक वर्ष पुढे सरकत असताना शिष्यवृत्तीची रक्कम वेळेत न मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या प्रवेश शुल्क, शैक्षणिक साहित्य , वस्तीगृह व इतर शैक्षणिक खर्चाचा भार कामगारांच्या कुटुंबावर पडत आहे. त्यामुळे प्रलंबित शिष्यवृत्तीची प्रकरणे तातडीने निकाली काढून विद्यार्थ्यांच्या खात्यावर शिष्यवृत्तीची रक्कम जमा करावी, तसेच नूतनीकरणाची प्रलंबित प्रकरणे त्वरित मार्गी लावावीत, अशी मागणी बांधकाम कामगारांकडून होत आहे.

# मौजे कामळज घाटावर पोलीसांची कारवाई

नांदेड/प्रतिनिधी-लोहा तालुक्यातील मौजे कामळज शिवारात सुरु असलेल्या नदी पात्रातील अवैध रेती उत्खननच्या ठिकाणी उस्माननगर पोलीसांनी बुधवारी छापा टाकुन ८० लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

मौजे कामळज शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रातून अवैधरित्या रेती उपसा सुरु असल्याची माहिती उस्माननगर पोलीसांना मिळाली. बुधवारी सायंकाळी सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश मुळीक, फौजदार गजानन गाडेकर, फौजदार सुनील सुर्यवंशी व पोलीस कर्मचाऱ्यांनी रेती घाटावर छापा टाकला. नदीच्या पात्रातून रेती उपसा करणारे चार लोखंडी फायबर बोट, दोन छोटे इंजीन व दहा ब्रास रेती असा ८० लाख रुपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी उस्माननगर पोलीस ठाण्यात अरविंद कांबळे रा.कापसी, अविनाश शिराळे रा.गोळेगाव, गणेश माधवराव उबाळे रा.मारतळा व किशन ढगे रा.येळी यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नगराध्यक्ष-उपनगराध्यक्षांच्या वादावर भाजपचा सवाल;अतिक्रमण कारवाईत समान नियमांची मागणी

कंधार/प्रतिनिधी-कंधार शहरातील नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष यांच्यातील कथित वादाच्या पार्श्वभूमीवर भाजपचे शहराध्यक्ष गंगाप्रसाद यन्नावार यांनी प्रशासनाच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. सत्तेतील पदाधिकाऱ्यांमधील मतभेदांपेक्षा शहरातील रस्ते, स्वच्छता, पिण्यायोग्य स्वच्छ पाणी, वाहतूक, अतिक्रमण आणि विकासाच्या प्रश्नांना प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

अतिक्रमणाच्या प्रश्नावर कायद्यानुसार कारवाई झाली पाहिजे, मात्र कारवाई करताना गरीब-श्रीमंत, सामान्य नागरिक अथवा राजकीय पदाधिकारी असा कोणताही भेदभाव न करता नियम सर्वांसाठी समान असला पाहिजे, या वादाची नेमकी पार्श्वभूमी जनतेसमोर स्पष्ट झाली पाहिजे, याबाबत प्रशासनाने पारदर्शकता ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली. नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष सदस्य ही पदे जनतेने दिलेली जबाबदारी आहेत. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा शहराच्या समस्यांवर काम करणे अपेक्षित आहे आपली भूमिका कोणत्याही व्यक्तीविरोधात किंवा पक्षविरोधात नसून जनतेच्या प्रश्नांशी संबंधित असल्याचे स्पष्ट करत यन्नावार यांनी पारदर्शक प्रशासनाची मागणी केली. कामाचा आणि निर्णयांचा हिशेब कंधारच्या जनतेला हवा आहे, असे त्यांनी सांगितले.नगरपालिका ही कोणाचीही वैयक्तिक मालमत्ता नसून कंधारच्या जनतेची संस्था आहे. त्यामुळे सत्तेतील पदाधिकाऱ्यांमधील मतभेदांचा परिणाम नागरिकांना मिळणाऱ्या मूलभूत सुविधांवर होता कामा नये, असेही त्यांनी नमूद केले.

# श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त कीर्तन

मुखेड/प्रतिनिधी-दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त शनिदेव मंदिराच्या पाठीमागे असलेल्या श्रीकृष्ण मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. या वर्षी दि. ४ सप्टेंबर रोजी रात्री १० वाजता ह.भ.प. यज्ञेश्वर हरिहर महाराज दीक्षित यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता काल्याचे कीर्तन होणार असून, यानंतर जन्माष्टमी महोत्सवाची सांगता होणार आहे.या धार्मिक कार्यक्रमास परिसरातील कृष्णभक्त व भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कीर्तनाचा व धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक डॉ. राहुल मुक्कावार तसेच सर्व यादव गवळी समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

पान १ वरुन

## डीजेविरोधात आवाज...

आरोपही त्यांनी केला.गणेशोत्सव साजरा करण्यास आपला कोणताही विरोध नसून, सार्वजनिक उत्सवांमध्ये ध्वनीप्रदूषण होणार नाही आणि वाहतुकीला अडथळा निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे, अशी भूमिका बापट यांनी स्पष्ट केली. त्यामुळे धार्मिक उत्सव आणि नागरिकांच्या आरोग्याचा अधिकार यामध्ये समतोल राखण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.विद्यानंद बापट हे ३७ वर्षीय असून मूळचे रत्नागिरीचे आहेत. गेल्या आठ वर्षांपासून ते पुण्यातील नारायण पेठ येथे वास्तव्यास आहेत. ते बीपीओ क्षेत्रात कार्यरत असून पुण्यातील विविध पुरोगामी उपक्रमांमध्येही सहभागी होत असल्याचे सांगण्यात येते. दरम्यान, पुण्यातील वाढत्या ध्वनीप्रदूषणाबाबत डेक्कन जिमखाना परिसरातील रहिवासी शरद केळकर यांनी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे. या तक्रारीची दखल घेत आयोगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला कारणे दाखवा नोटीस बजावल्याचे सांगण्यात येत आहे.

## पावसाने दडी मारल्याने...

अतिवृष्टी आणि महापुराचा सामना केल्यानंतर यंदा पावसाने दडी मारल्याने शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. खरीप पिकांसाठी आवश्यक असलेला पाऊस लवकर होण्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा आहे.

## धनुष्यबाण कुणाचा? शरद पवारांचा...

एकीकडे सर्वोच्च न्यायालयात शिवसेना आणि धनुष्यबाणाच्या मालकीसाठी कायदेशीर लढाई सुरू आहे, तर दुसरीकडे त्याच्या संभाव्य निकालावरून महाराष्ट्राच्या राजकारणात उत्सुकता वाढली आहे. शिंदे गटाकडून पक्षघटना आणि विधिमंडळातील बहुमताचा आधार घेत आपला दावा मजबूत करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय केवळ एका पक्षाच्या चिन्हापुरता मर्यादित न राहता महाराष्ट्रातील आगामी राजकीय समीकरणांवरही परिणाम करणारा ठरण्याची शक्यता आहे.

# राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष हरदीप सिंग गिल यांचा नांदेड दौरा

नांदेड/प्रतिनिधी-राष्ट्रीय सफाई कर्मचारी आयोगाचे उपाध्यक्ष हरदीप सिंग गिल हे दि. ४ सप्टेंबर, २०२६ रोजी नांदेड दौऱ्यावर येत आहेत. त्यांच्या दौरा कार्यक्रमाचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

शुक्रवार, दि.४ सप्टेंबर रोजी दुपारी ३.२० वाजता गाझीयाबाद विमानतळ येथून विमानाने प्रयाण करुन सायंकाळी ५.१० वाजता नांदेड विमानतळावर आगमन. सायंकाळी ५.४५ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात सफाई कर्मचारी आढावा बैठकीस उपस्थिती व सर्कीट हाऊस, नांदेड येथे मुक्काम राहील. शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ५ वाजता वाहनाने पुणेकडे प्रयाण करतील.

# स्वाधार योजनेच्या नूतनीकरणासाठी १५ सप्टेंबरपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

नांदेड/प्रतिनिधी- अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता स्वाधार योजनेचा लाभ घेत असलेल्या पात्र विद्यार्थ्यांनी नूतनीकरणाचे अर्ज दि. १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत ऑनलाइन सादर करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शिवानंद मिनगिरे यांनी केले आहे.

अनुसूचित जातीतील ५० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेले आणि समाज कल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेले पात्र विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत. महानगरपालिका क्षेत्रापासून पाच किलोमीटरच्या आत तसेच नगरपालिका, नगरपरिषद, नगरपंचायत आणि तालुक्याच्या हद्दीतील महाविद्यालयांमध्ये प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो.शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी नूतनीकरणाचा अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी संकेतस्थळावर आपल्या यूजर आयडी व पासवर्डच्या माध्यमातून लॉगिन करून अर्ज परिपूर्ण कागदपत्रांसह ऑनलाइन सादर करावा. अर्जाची सद्यस्थिती देखील याच संकेतस्थळावर तपासता येणार आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४